महाज्योती
ज्ञानदीप समतेचा

सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन

इतर मागास बहुजन कल्याण विभाग, महाराष्ट्र राज्य, मुंबई

कार्यालय, व्यवस्थापकीय संचालक, महात्मा ज्योतिबा फुले संशोधन व प्रशिक्षण संस्था (महाज्योती), महाराष्ट्र राज्य, नागपूर

डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन, 3 रा माळा, दिक्षाभूमी रोड, श्रध्दानंद पेठ, नागपूर - 440 022

दुरध्वनी क्रं. 0712-2959381 IN: U85300PN2019NPL187405 ई मेल - mahajyotingp@gmail.com

जा.क्र. महाज्योती/नागपूर/आस्था/2065/2024-25 **दिनांक** :-19/08/2024

## -:परीपत्रक:-

**विषय:- महाज्योती, मार्फत इतर मागासवर्गीय, विमुक्त जाती-भटक्या जमाती व विशेष मागास प्रवर्गातील विद्यार्थ्यांकरीता राबविण्यात येणाऱ्या MBA-CAT/CMAT-CET, UGC-NET/CSIR/MH-SET, मिलीटरी भरती परीक्षा पुर्व प्रशिक्षण 2024-25 करीता पात्र विद्यार्थ्यांना प्रवेश द्यावयाच्या बाबतीत प्रशिक्षण संस्थांना सूचना.**

महाज्योती, मार्फत इतर मागासवर्गीय, विमुक्त जाती-भटक्या जमाती व विशेष मागास प्रवर्गातील विद्यार्थ्यांकरीता राबविण्यात येणाऱ्या MBA-CAT/CMAT-CET, UGC-NET/CSIR/MH-SET, मिलीटरी भरती परीक्षा पुर्व प्रशिक्षण 2024-25 करीता चाळणी परीक्षा घेतलेली असून सदर परीक्षांचे निकाल व निवड यादी महाज्योतीच्या संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात आलेले आहे. त्याअनुषंगाने सर्व प्रशिक्षण संस्थांना विद्यार्थ्यांना रुजु करुन घेताना कोणत्या बाबींची काळजी घ्यावी, याबाबत सूचना निर्गमित करण्यात येत आहेत. खालील नमुद सूचनांचे पालन करुनच सर्व संस्थांनी विद्यार्थ्यास प्रवेश द्यावा.

1. विद्यार्थ्याने अर्जामध्ये भरलेली माहिती व प्रत्यक्षात सादर केलेली माहिती ही समान असल्याची खात्री करावी.
2. ज्याने परीक्षा दिली तसेच निवड यादितील प्रवर्गानुसार व मेरीटनुसार महाज्योती, मार्फत लावण्यात आलेल्या यादितील विद्यार्थी प्रवेश घेण्याकरीता आला आहे, याची खात्री करावी.
3. विद्यार्थ्यांनी ज्या जात प्रवर्गातून अर्ज भरलेला आहे, त्याच प्रवर्गाचे जात प्रमाणपत्र सादर केल्याची खात्री करावी.
4. विद्यार्थ्याची अनाथ व दिव्यांग वर्गवारीत निवड झाली असल्यास त्याबाबतचे प्रमाणपत्र तपासावे.
5. उमेदवाराने यापुर्वी महाज्योती, तसेच सारथी, या संस्थेचे प्रशिक्षण घेतले नसल्याबाबतचे स्वयंघोषणापत्र भरुन घेणे बंधनकारक आहे.
6. उमेदवार एका वेळी एकाच शासन अनुदानित संस्थेत प्रशिक्षण घेत असल्याची खात्री करावी. कोणताही उमेदवार एकाच कालावधीत दोन किंवा अधिक संस्थेमध्ये प्रशिक्षणाचा लाभ घेत नसल्याची खात्री करावी.
7. विद्यार्थ्याने परीक्षेकरीताची विहित वयोमर्यादा ओलांडली आहे किंवा कसे याची खात्री करुनच व जन्मतारीख तपासूनच संस्थेने विद्यार्थ्याला प्रवेश द्यावा. परीक्षेकरीताची विहित वयोमर्यादा 17-19

वर्ष (फक्त मिलीटरी भरती प्रशिक्षणाकरीता), ओलांडलेल्या विद्यार्थ्याला प्रवेश देऊ नये. असे प्रकरण आढळल्यास निर्णयाकरीता महाज्योती, कार्यालयाकडे वर्ग करावे.

8. पुरुष उमेदवाराने चुकून 'Female' नमुद केल्यामुळे त्यांची निवड झालेली असल्यास असे प्रकरण महाज्योती, नागपूर वर्ग करावे. अशा उमेदवारांची सर्वसाधारण प्रवर्गातून निवड होते, किंवा कसे याबाबत महाज्योतीकडून तपासणी करण्यात येईल व त्यानुसार योग्य ती कार्यवाही करण्यात येईल.
9. उमेदवाराची एखाद्या पदाकरीता निवड झालेली आहे काय ? निवड झाली असल्यास तो विद्यार्थी प्रशिक्षण कालावधी पुर्ण करणार असल्याबाबत लिहून घ्यावे. प्रशिक्षण अर्ध्यावर सोडल्यास विद्यार्थ्याला विद्यावेतन व आकस्मिक निधीची रक्कम भरुन द्यावी लागेल याची जाणीव करुन द्यावी. त्याबाबत हमीपत्र लिहून घ्यावे.
10. विद्यार्थ्याने प्रशिक्षण वर्गात उपस्थित राहणे बंधनकारक आहे. तसेच विद्यार्थ्यास प्रशिक्षण हे ऑफलाईन स्वरुपाचे मिळत असून प्रति महिन्याला 75% पेक्षा कमी उपस्थिती असल्यास विद्यावेतन दिले जाणार नाही. याची पुर्ण कल्पना द्यावी.

त्याअनुषंगाने आवश्यक त्या अटी व शर्तीचे पालन करुन निवड झालेल्या उमेदवारांना प्रवेश देण्यात यावा व त्याचा अहवाल महाज्योती, कार्यालयास सादर करावा. उमेदवारांकडून जमा करुन घ्यावयाच्या कागदपत्रांची यादी (सहपत्र) सोबत जोडलेली आहे. सदर कागदपत्रे संस्थेने आपल्या अभिलेखात कायमस्वरुपी जतन करावीत व त्याचे स्कॅन करुन महाज्योती, कार्यालयास रुजु अहवालासोबत सादर करावे.

उमेदवाराने सादर केलेली सर्व कागदपत्रे यथायोग्य असल्याची खात्री करणे ही संस्थेची जबाबदारी असेल. यामध्ये चूक आढळून आल्यास संबंधित संस्थांनी नोंद घ्यावी. तसेच संस्थेच्या चूकीमुळे जर विद्यार्थ्याला आकस्मिक निधी किंवा विद्यावेतन वितरीत झाले असले तर त्याची वसूली संस्थेला देय असणाऱ्या प्रशिक्षण शुल्कातून केली जाईल, याचीही नोंद घ्यावी.

(स्वा.)
राजेश खवले
**व्यवस्थापकीय संचालक**
महात्मा ज्योतीबा फुले संशोधन व प्रशिक्षण संस्था
(महाज्योती), महाराष्ट्र राज्य, नागपूर

**प्रत**:

1. सी.आर.जी.अॅकडमी, पुणे, ज्ञानज्योती अॅकडमी पुणे, युपीएससी अकादमीया, पुणे व स्पेक्ट्रम अॅकडमी, पुणे, यांना माहितीस्तव सादर.
2. सर्व संबंधित विद्यार्थी.